**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिसस/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/2367 दिनांक : २७.१०.२०२०

**तात्काळ ईमेलद्वारे / अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

विषय : - **महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे त्वरीत वितरणाबाबत...**

संदर्भ : - मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२०-२१/७१४० दि. २७.१०.२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी विद्यार्थी / महाविद्यालयांना अधिक माहितीसाठी तसेच प्रलंबित ऑनलाईन अर्ज तपासणी व सर्व प्रलंबित शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना जमा होणेसाठी सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे / सोबत विद्यार्थीनिहाय / महाविद्यालयनिहाय यादीसह आणि सविस्तर कारणांसह कळविण्यात आले आहे. ज्यामध्ये आधार क्रमांक त्यांचे बँक खात्याशी संलग्न नसणे (Adhar number is not seeded in NPCI), खाते बंद असणे, खातेधारक सज्ञान झाल्याचे कागदपत्र अपूर्ण असणे, खाते क्रमांक निष्क्रीय (inoperative) असणे इ. कारणांमुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा झालेली नसल्याचे दिसून येते.

**तरी विद्यार्थ्यांच्या खातेवर शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी येणाऱ्या अडचणींची पूर्तता करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या यादीतील ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा होण्यासाठी येणाऱ्या अडचणींचे निराकरण झाले आहे / ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा झालेली आहे / रक्कम जमा होणे प्रलंबित आहे अशा विद्यार्थ्यांची सर्व योजनानिहाय माहिती सोबतच्या विवरणपत्रात या कार्यालयास ईमेलद्वारे ( jdpunescholarship@gmail.com) फक्त याच ईमेल आयडीवर डी.व्ही.टी.टी. सुरेख मराठी फॉन्ट किंवा Times New Roman फॉन्टमध्ये मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅटमध्ये तात्काळ सादर करावी.**

28/10

**(डॉ. मोहन खताळ)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

**प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१** यांना माहितीस्तव सादर.

महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे त्वरीत वितरणाबाबत.

महाविद्यालयाचे नाव -

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | शिष्यवृत्ती रक्कम प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | सद्यस्थितीत शिष्यवृत्ती जमा झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | अडचणींचे निराकरण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | अडचणींचे निराकरण न झाल्यामुळे शिष्यवृत्ती प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

स्वाक्षरी